नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २१७ Issue - 217 | वार मंगळवार दि. २४ डिसेंबर २०२४ Blow- Tuesday Date 24 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## श्याम बेनेगल यांचे निधन

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'मंथन', 'अंकुर', 'निशांत', 'भूमिका' अशा अनेक समांतर सिनेमांचे निर्माते व दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचे निधन झाले आहे. भारतीय सिनेसृष्टीत महत्त्वाचं योगदान देणारे श्याम बेनेगल यांनी आज (२३ डिसेंबरला) अखेरचा श्वास घेतला. त्यांची मुलगी पिया बेनेगल हिने यासंदर्भात इंडियन एक्सप्रेसला माहिती दिली आहे. श्याम बेनेगल यांच्या निधनाचे वृत्त खरे आहे, असं पियाने सांगितलं.



श्याम बेनेगल ९० वर्षांचे होते. आज संध्याकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला असं त्यांच्या मुलीने सांगितलं. पिया बेनेगल 'इंडियन एक्सप्रेस'शी बोलताना म्हणाली, श्याम बेनेगल यांचे आज (२३ डिसेंबरला) संध्याकाळी ६.३० वाजता निधन झाले.

पिया बेनेगलने दिलेल्या माहितीनुसार, मुंबई सेंट्रल येथील वोकार्ट हॉस्पिटलमध्ये आज सायंकाळी श्याम बेनेगल यांची प्राणज्योत मालवली. श्याम बेनेगल बऱ्याच काळापासून क्रोनिक किडनीच्या समस्येने ग्रस्त होते. ते या आजाराच्या शेवटच्या टप्प्यात पोहोचले होते. आज उपचारादरम्यान रुग्णालयात त्यांचे निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्काराबद्दल लवकरच निर्णय घेतला जाईल.

'अंकुर', 'निशांत', 'मंथन', 'भूमिका', 'जुनून' हे आणि असे अनेक चित्रपट त्यांनी दिले. 'अंकुर'मुळे हिंदी सिनेसृष्टीला शबाना आझमी नावाची अभिनेत्री मिळाली. समांतर सिनेमा दिग्दर्शित करण्यात त्यांचं खूप मोठं योगदान होतं. 'अंकुर' या त्यांच्या पहिल्यावहिल्या सिनेमाला राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. तसंच 'निशांत', 'मंथन', 'जुनून', 'आरोहण' या चित्रपटांनाही राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आले आहेत. 'महाभारत' या संकल्पनेवर त्यांनी दिग्दर्शित केलेला 'कलयुग' हा सिनेमा आजही सिनेसृष्टीतला मास्टरपीस मानला जातो. 'सरदारी बेगम' हा त्यांचा उर्दू सिनेमाही अनेक कारणांनी चर्चेत राहिला. तर 'झुबैदा' हा सिनेमाही चर्चेत होता. 'नेताजी सुभाषचंद्र बोस द फरगॉटन हिरो' आणि 'वेल डन अब्बा' हे त्यांचे अलिकडचे चर्चेत राहिलेले चित्रपट आहेत. समांतर सिनेमाशी श्याम बेनेगल यांची नाळ जोडली गेली होती. त्यांच्या चित्रपटांमधून अनंत नाग, नसीरुद्दीन शाह, ओम पुरी, शबाना आझमी, स्मिता पाटील हे कलाकार घडले. एका मनस्वी दिग्दर्शकाने आज अखेरचा श्वास घेतला आहे.

समांतर सिनेमाचं युग पोरकं झाल्याची भावना आज प्रत्येकाच्या मनात आहे. श्याम बेनेगल यांनी समांतर सिनेमांच्या माध्यमातून भारतीय चित्रपटसृष्टीत मोठं योगदान दिलं. त्यांना त्यांच्या सिनेमांसाठी प्रतिष्ठित दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. तसेच त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत तब्बल १८ राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसह अनेक पुरस्कार मिळवले होते.

# दीड वर्षात विक्रमी सरकारी नोकऱ्या

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची माहिती, ७१ हजारहून अधिक युवकांना नियुक्तीपत्र

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : गेल्या दीड वर्षात आमच्या सरकारने सुमारे १० लाख तरुणांना कायमस्वरूपी सरकारी नोकऱ्या दिल्या आहेत आणि हा एक विक्रम आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी सांगितले. केंद्र सरकारतर्फे आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या उमेदवारांना दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करताना पंतप्रधान मोदी बोलत होते. या रोजगार मेळाव्यात ७१ हजारहून अधिक लोकांना नियुक्तीपत्र देण्यात आले. दरम्यान, यापूर्वीच्या कोणत्याही सरकारच्या कार्यकाळात अशा पद्धतीने नोकऱ्या दिल्या गेल्या नाहीत, असा ठाम दावाही मोदी यांनी या वेळी केला.

सध्याचे युवक हे केंद्र सरकारच्या धोरणे आणि कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी आहेत. प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेमुळे भरती प्रक्रियेला चालना मिळाली आहे. 'रोजगार मेळावे' (भरती मोहीम) तरुणांना सक्षम बनवून त्यांच्या क्षमतांना चालना देतात. भारतातील युवक आज आत्मविश्वासाने भरलेला आहे आणि तो प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत आहे, असे मोदी म्हणाले.

मोदी म्हणाले की, 'भारतीय युवकांच्या क्षमता आणि कौशल्याचा जास्तीत जास्त वापर करणे हे सरकारचे प्राधान्य आहे आणि ते अनेक योजनांच्या केंद्रस्थानी आहेत, मग ते 'स्टार्ट-अप इंडिया' असो, 'डिजिटल इंडिया' असो किंवा अंतराळ आणि संरक्षण क्षेत्रातील सुधारणा असो.' राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून तरुणांच्या विकासासाठी पावले उचलली जात आहेत, तसेच मातृभाषेच्या वापरावर भर दिला जात असल्याचे मोदी यांनी नमूद केले. भरती परीक्षांमध्ये युवकांना भाषेचा अडथळा येऊ नये म्हणून १३ भारतीय भाषांचा समावेश करण्यात आल्याचे मोदी यांनी सांगितले.

माजी पंतप्रधान चरण सिंग यांची जयंती सोमवारी साजरी करण्यात आली. चरण सिंग ग्रामीण भारताच्या विकासासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी उभे होते, हे लक्षात घेऊन आमच्या सरकारने खेड्यापाड्यात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करून त्याचे पालन केल्याचे मोदी म्हणाले.

नोकरभरतीत महिलांचा सहभागही लक्षणीय आहे, महिलांनी प्रत्येक क्षेत्रात स्वावलंबी व्हावे हा सरकारचा प्रयत्न आहे. महिलांना २६ आठवड्यांची प्रसूती रजा मंजूर करण्याच्या निर्णयामुळे त्यांना खूप मदत झाली. 'पीएम आवास योजने'अंतर्गत बांधलेल्या घरांच्या बहुसंख्य मालक महिला असल्याचे मोदी यांनी या वेळी अधोरेखित केले. देशात महिलांच्या नेतृत्वाखाली विकास होत आहे, असे ते म्हणाले.

रोजगार मेळाव्यात (७१ हजारहून अधिक) भरती झालेल्यांमध्ये २९ टक्क्यांहून अधिक इतर मागासवर्गीय प्रवर्गातील (ओबीसी) उमेदवार आहेत. काँग्रेसच्या १० वर्षांच्या सत्तेच्या तुलनेत मोदी सरकारच्या काळात इतर




मागासवर्गीय उमेदवारांच्या भरतीत १७ टक्क्यांनी वाढ झाल्याचा दावा केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी या वेळी केला.

देशाचा विकास युवकांच्या कठोर परिश्रम, क्षमता आणि नेतृत्वावर अवलंबून असतो. भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्यासाठी वचनबद्ध आहे. कारण देशाची धोरणे आणि निर्णय आपल्या प्रतिभावान युवकांना सक्षम बनविण्यावर केंद्रित आहेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

## पंतप्रधान आवास योजनेत राज्यात आणखी १३ लाख घरे : मुख्यमंत्री फडणवीस यांनी मानले पंतप्रधानांचे आभार


**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात महायुतीचे सरकार स्थानापन्न होताच पंतप्रधान आवास योजनेंतर्गत राज्यासाठी आणखी १३ लाख ३० हजार घरे मंजूर करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्राच्या या निर्णयाचे स्वागत करीत लाखो कुटुंबांचे पक्क्या घराचे स्वप्न साकार होण्यास मदत होत असल्याचे सांगितले.

देशातील गोरगरीब नागरिकांना हक्काचे पक्के घर देण्यासाठी केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या माध्यमातून सर्वांसाठी घरे उपक्रमांतर्गत सन २०१६पासून पंतप्रधान आवास योजना राबविली जाते. ऑगस्ट २०२४मध्ये केंद्राने आणखी दोन कोटी घरे बांधण्यासाठी या योजनेला पाच वर्षांची मुदतवाढ दिली आहे. या योजनेनुसार राज्य सरकारने २०१८मध्ये राज्यात सर्वेक्षण करून पात्र लाभार्थ्यांची यादी केंद्राला पाठविली होती. त्यानुसार २०१४-१५ या आर्थिक वर्षात ग्रामीण भागासाठी ६ लाख ३७,०८९ घरे मंजूर करण्यात आली होती. राज्य सरकारच्या मागणीनुसार आता यात वाढ करीत आणखी १३ लाख २९,६७८ घरांना मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे राज्यासाठी एका वर्षात १९ लाख ६६,७६७ घरे केंद्राने मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे आभार मानले. मोदींच्या नेतृत्वाखालील पीएम आवास योजनेमुळे राज्यातील लाखो कुटुंबांचे पक्क्या घराचे स्वप्न साकार होण्यास मदत होत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय उत्कृष्ट संपादक म्हणून कमलाकर सोनकांबळे यांचा गौरव




**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

डॉ बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय उत्कृष्ठ संपादक म्हणून दैनिक यशसिद्धि न्युजचे संपादक कमलाकर सोनकांबळे यांची गौरव पुरस्कारानी सन्मान करण्यात आले

कॉलेजमध्ये युवकांसाठी दैनिक संचारमध्ये तारुण्यादुत व दैनिक लोकमत मध्ये युवामंच नावाचा उपक्रम राबविले जात. त्यामध्ये कॉलेजचे नेतृत्व दोन्ही वृत्तपत्रात कॉलेज प्रतिनीधी म्हणून काम केले. त्यानंतर साप्ताहिक सत्यप्रिय मध्ये कार्यकारी संपादक व साप्ताहिक कालिगंगा मध्ये क्राईम रिपोर्टर म्हणून काम करत असताना स्वतचे एक वृत्तपत्र असायला हवे असे त्यांना कायम वाटायचे परंतु परस्थिती मुळे काहीच करता येत नसायचे.

सामाजिक कार्य करत असताना अनेक जातीवादी लोकांना संघर्ष करून सामाजिक न्याय देण्याचे प्रयत्न करत असतात विविध क्षेत्रात ते काम करत असताना सम्यक बहुउद्देशीय सहकारी संस्थेचे चेअरमन, सम्यक उद्योग समूहाचे चेअरमन, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष, ज्या मालकीचे वृत्तपत्र चालवली जात आहे अशा सिद्धार्थ सोशल फाउंडेशन अध्यक्ष म्हणून ही ते काम पाहत आहेत सामाजिक उपक्रमासोबत आर्थिक उन्नती युवकांना असे मिळेल यासाठी प्रयत्नशील असतात कोरोना काळात सोलापूर,अक्कलकोट व पुण्यासारख्या शहरात संस्थेच्या माध्यमातून मोफत किट वाटप करण्यात आले आहे त्यासोबत कोरोणा विषय जनजागृती करण्यात आहे आहेत.

सध्या शेतकरी, महिला, मजूर, कष्टकरी, विद्यार्थी, वृद्ध वा जेष्ठ नागरिकाचे प्रश्न याविषयीची चर्चा घडवून आणणे विचार बनवा करताना त्यांचे दैनिक काम करताना दिसत आहे. हल्ली असे प्रश्न अतिशय हळुवारपणे हाताळणे गरजेचे आहे. परखड चिकित्सा, रोखठोक टीका ... त्यांच्या दैनिक यशसिद्धि न्युजच्या माध्यमातून आधुनिक विचारांचा वेध घेण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. जनतेतला भ्रम आणि संभ्रम दूर करण्यासाठी त्यांचे लेखन उपयुक्त ठरले आहे. यातूनच मूक क्रांतीकडे चाललेल्या नव्या भारताची जडणघडण होण्यास त्यांचे योगदान पोषक ठरत आहे. यामुळे प्रसार माध्यमांची भूमिका मध्यवर्ती ठरली आहे. या पार्श्वभूमीवर कमलाकर सोनकांबळे यांचा सन्मान योग्य वाटतो.

या सर्व संघर्ष जीवन जगत असताना भावाच्या प्रेमाचे आशीर्वाद भिऊ नको मी तुझ्या पाठीशी आहे व गुरुवर्य यांचा फक्त तू लढ समाजाच्या हितासाठी, गावाच्या विकासासाठी, देशाच्या प्रगतीसाठी हे वाक्य जगण्याला प्रेरणा देणारे असतात

लोकशाहीवादी मूल्यांची पेरणी करणारे कमलाकर सोनकांबळे हे आंबेडकर चळवळीतील दीर्घकाळ चालणारे एक मुखपत्र म्हणून ओळखले जाते त्या वर्तमानपत्राचे ते संपादक आहेत. सोलापूर जिल्ह्यातील व आसपासच्या विविध गावातील राजकीय भूमिका सामाजिक घडामोडी इत्यादी अनेक वर्ष ते वार्तांकन करत आहेत त्यांचे भिमा कोरेगावचे इतिहास सांगतो महार रेजिमेंट सैनिक यश सिद्धि ब्रीद वाक्य घेऊन जसा इतिहास घडवला तसा दैनिक यश सिद्धि न्यूज भविष्यात सामान्य बहुजन समाजाला न्याय देण्यासाठी लढा देईल अशी आशा व्यक्त करतो, सध्या वाचक, विद्यार्थी, अनेक अभ्यासक, महिला, कष्टकरी व अनेक स्तरातून त्याचे वाचन केले जाते. अल्पकाळातच ते एक लोकप्रिय दैनिक म्हणून पुढे आलेले आहे. या परिसरातील अनेक महत्त्वाच्या क्षेत्रावर त्यांनी वार्तांकन करून आपले स्थान मजबूत केले आहे. कमलाकर सोनकांबळे संपादक म्हणून आंबेडकर चळवळीतील संपूर्ण चळवळीचा रचनात्मक अभ्यास व त्याची मांडणी करताना दिसून येतात. प्रत्येक समाजाला त्याचा सन्मान, स्वाभिमान व स्वावलंबन आवश्यक असते. जगण्याचा हक्क मिळावा. यासाठी ते नेहमी अशा प्रश्नावर ठसठशीत प्रकाश टाकताना दिसून येतात. सोनकांबळे हे आंबेडकरवादी भूमिकेतून लेखन प्रदर्शित करत असतात. व्यक्ती स्वातंत्र्य, मानवी अधिकार, जगण्याचा हक्क, सन्मान हा प्रत्येक समाजातील घटकाला मिळाला पाहिजे. दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांना शिकण्याची व संघटन करण्याची प्रेरणा मिळायला हवी. यासाठी ते सतत समाजातील एकात्मता, समानता, बंधुभाव व सामाजिक न्याय या क्षेत्रावर त्यांनी सदैव लेखन करत असल्याचे दिसून येते. या पुढील काळात संविधान मूल्य मांडून त्यावर लोकांचे मत परिवर्तन करण्याची तळमळ त्यांच्यामध्ये आहे. बाबासाहेबांच्या संविधानवादी व धम्म प्रबोधन चळवळीतूनच प्रेरणा घेऊन तरुण पिढी नवभारताच्या चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान कसे देता येईल याविषयी त्यांचं वार्तांकन व लेखन महत्त्वाचे, उपयुक्त व उदबोधक ठरले आहे. राजकीय सामाजिक आर्थिक धार्मिक सांस्कृतिक या क्षेत्रात एक वैचारिक क्रांती कशी घडून येईल ? माणसाला माणूस म्हणून कसे जगता येईल याकरता त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून संघर्ष संघर्षमय प्रवास अतिशय मनोरंजक व उद्बोधक आहे.

कमलाकर सोनकांबळे यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा....!

- डॉ. डी. टी. गायकवाड, पुणे (लेखक, साहित्यिक) मो. ९८६०५९१३०५

## एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना खूशखबर! कमाल वयोमर्यादेत वाढ

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) राज्य शासकीय सेवेतील विविध पदांच्या भरतीसाठीच्या कमाल वयोमर्यादेत एक वर्षाने वाढ करण्याचा निर्णय शुक्रवारी राज्य सरकारने घेतला. या निर्णयाचा शासन निर्णय आज जाहीर करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात माहिती दिली. वयोमर्यादा ओलांडल्याने नोकरीपासून वंचित राहण्याची चिंता लागलेल्या लाखो उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

३१ डिसेंबर, २०२३ पर्यंत शासकीय सेवेत सरळ सेवेने नियुक्तीसंदर्भात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व जाहिरांतीकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेत एक वर्ष इतकी शिथिलता देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण अधिनियम-२०२४, २६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता राज्य शासकीय सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

सदर अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पदसंख्या व आरक्षण नमूद करून मागणीपत्रे सुधारित करण्याची कार्यवाही आवश्यक आहे. याकरिता सुधारित मागणीपत्रानुसार जाहिराती प्रसिद्ध करण्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २०२४ च्या नियोजित वेळापत्रकापेक्षा साधारणतः ९ ते १० महिने विलंब झाला. त्यामुळे राज्यातील अनेक उमेदवारांनी शासन सेवेतील प्रवेशाची विहित कमाल वयोमर्यादा ओलांडली असल्याने असे उमेदवार परीक्षेसाठी अर्ज करण्यास अपात्र ठरत आहेत. यानुषंगाने कमाल वयोमर्यादेत शिथिलता देण्याबाबत शासन निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ०१ जानेवारी २०२४ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत पदभरतीसाठी ज्या जाहिराती नव्याने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत आणि त्या जाहिरातींच्या निवड प्रक्रियेचा कोणताही टप्पा पार पडलेला नाही, अशा जाहिरातीकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांना सामान्य प्रशासन विभागाच्या २५ एप्रिल २०१६ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत एक वर्ष इतकी शिथिलता देण्यात आली आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा मोठा निर्णय

पुन्हा परीक्षा देऊन पुढच्या वर्गात जाण्याची तरतूद

## इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी सरसकट उत्तीर्ण धोरण रद्द

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी सरसकट उत्तीर्ण करण्याचं धोरण रद्द केलं आहे. हे धोरण सुरुवातीला प्रचंड टीकेचा विषय ठरला होता. त्यामुळे आता अनुत्तीर्ण होणारे विद्यार्थी पुढच्या वर्गात जाऊ शकणार नाहीत. त्यांना दोन महिन्यांच्या आत परीक्षा देऊन पुढच्या वर्गात जाण्याची तरतूद करण्यात आली आहे.



शिक्षण हक्क कायद्यात २०१९ च्या दुरुस्तीनंतर १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांनी दोन वर्गांसाठी नो डिटेंशन पॉलिसी आधीच काढून टाकली होती. नवीन धोरणानुसार, जे विद्यार्थी नियमित परीक्षांनंतर पदोन्नतीचे निकष पूर्ण करू शकत नाहीत, त्यांना अतिरिक्त संधी दिली जाईल. निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांत पुनर्परीक्षा आयोजित केली जाईल. पास होण्याकरता ही एक संधी असेल. पुनर्परीक्षेनंतर एखादा विद्यार्थी पुन्हा अनुत्तीर्ण झाल्यास त्याला त्याच वर्गात ठेवलं जाणार आहे. या काळात शिक्षक विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करणार. तसंच, शिक्ष विद्यार्थ्यांच्या पालकांशीही समन्वय साधणार आहेत. या सुधारित पद्धतीचा उद्देश उत्तम शैक्षणिक कामगिरी सुनिश्चित करणं आणि आवश्यक मानकांची पूर्तता करण्यासाठी धडपडत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे आहे.

पुनर्परीक्षेत येणारे मूल पुन्हा पदोन्नतीचे निकष पूर्ण करण्यास अपयशी ठरल्यास, त्याला त्याच वर्गात ठेवण्यात येईल. यावेळी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक मार्गदर्शन करतील, असं अधिसूचनेत म्हटलं आहे. तसंच, सरकारने एक स्पष्टीकरण जारी केलं आहे की कणत्याही मुलाचं प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्याला कोणत्याही शाळेतून काढून टाकले जाणार नाही.

## संपादकीय....

### रोजगाराच्या संधी

देशाचा विकास युवकांच्या कठोर परिश्रम, क्षमता आणि नेतृत्वावर अवलंबून असतो. भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्यासाठी वचनबद्ध आहे. कारण देशाची धोरणे आणि निर्णय आपल्या प्रतिभावान युवकांना सक्षम बनविण्यावर केंद्रित आहेत, असे नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. गेल्या दीड वर्षात आमच्या सरकारने सुमारे १० लाख तरुणांना कायम स्वरूपी सरकारी नोकऱ्या दिल्या आहेत आणि हा एक विक्रम आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी सांगितले. केंद्र सरकारतर्फे आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या उमेदवारांना दृरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करताना पंतप्रधान मोदी बोलत होते. या रोजगार मेळाव्यात ७१ हजारहून अधिक लोकांना नियुक्तीपत्र देण्यात आले. दरम्यान, यापूर्वीच्या कोणत्याही सरकारच्या कार्यकाळात अशा पद्धतीने नोकऱ्या दिल्या गेल्या नाहीत, असा ठाम दावाही मोदी यांनी या वेळी केला. सध्याचे युवक हे केंद्र सरकारच्या धोरणे आणि कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी आहेत. प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेमुळे भरती प्रक्रियेला चालना मिळाली आहे. 'रोजगार मेळावे' (भरती मोहीम) तरुणांना सक्षम बनवून त्यांच्या क्षमतांना चालना देतात. भारतातील युवक आज आत्मविश्वासाने भरलेला आहे आणि तो प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत आहे. 'भारतीय युवकांच्या क्षमता आणि कौशल्याचा जास्तीत जास्त वापर करणे हे सरकारचे प्राधान्य आहे आणि ते अनेक योजनांच्या केंद्रस्थानी आहेत, मग ते 'स्टार्ट-अप इंडिया' असो, 'डिजिटल इंडिया' असो किंवा अंतराळ आणि संरक्षण क्षेत्रातील सुधारणा असो.' राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून तरुणांच्या विकासासाठी पावले उचलली जात आहेत.

# १६ वर्षांपर्यंतच्या मुलांवर सोशल मीडियाच्या वापरावर बंदी घालणारे विधेयक मंजूर

ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांच्या आ-तील मुले-मुली इंस्टाग्राम, स्नॅपचॅट आणि तत्सम इतर सोशल मीडिया व्यासपीठांचा वापर करू शकणार नाहीत. अलीकडेच या संदर्भातील विधेयक तेथील संसदेत प्रचंड बहुमताने मंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने १०३, तर विरोधात १३ मते पडली. आता या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होणार आहे. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत अनेक देश असा विचार करू शकतात. एक मागोवा

ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांपर्यंतच्या मुलांवर सोशल मीडियाच्या वा-परावर बंदी घालणारे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. या लक्षवेधी घटनेचे पडसाद जगभर उमटू लागले आहेत. तिथे सिनेटच्या मंजुरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होणार आहे. हे जगात प्रथमच घडत असून या कायद्यामुळे ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षांच्या आतील मुले-मुली इंस्टाग्राम, स्नॅपचॅट आणि तत्सम सर्व प्रकारच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचा वापर करू शकणार नाहीत. मुख्य म्हणजे हे विधेयक सोशल मीडिया कंपन्यांनादेखील वयोमर्यादा लागू करण्यासाठी जबाबदार धरणार आहे. वर उल्लेख केलेला वयोगट आपल्या माध्यमांचा वापर करत नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी या कंपन्यांवर असेल. हा एक क्रांतिकारी निर्णय ठरल्यास आश्चर्य वाटणार नाही. आजच्या डिजिटल जगात मुले लहान वयातच इंटरनेट वापरायला लागली आहेत. युनायटेड नेशन्सच्या आकडेवारीनुसार, जगा-तील प्रत्येक अर्ध्या सेकंदाला एक मूल पहिल्यांदा ऑनलाइन जगात प्रवेश करते. स्वाभाविकच दिवसागणिक सोशल मीडिया वापरकर्त्या मुलांचे प्रमाण किती मोठे आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ही एक प्रकारची क्रांतीच आहे, पण या ऑनलाइन क्रांतीने अनेक गंभीर आव्हानेही सम‍ोर आणली. न कळत्या वयापासूनच सोशल मीडियाच्या गर्तेत अडकल्यामुळे त्याच्या वापराने व्यसनाधीनतेपर्यंत पोहोचल्यावर केवळ मानसिक आरोग्यच नाही तर शारीरिक समस्याही उद्भवू शकतात, असा इशारा जगभरातील तज्ज्ञ देत आहेत. यामुळेच जगभरात सोशल मीडिया कंपन्यांच्या जबाबदाऱ्या वाढवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अनेक देश विशेषत: मुलांच्या ऑनलाइन सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित करून नवीन कायदे करत आहेत. आता ऑस्ट्रेलियाने या दिशेने पाऊल टाकले असले तरी यामुळे त्यांच्यावर एकीकडे कौतुक तर दुसरीकडे टीकाही होत आहे.



सदर विधेयक संसदेत प्रचंड बहुमताने मंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने १०३ तर विरोधात केवळ १३ मते पडली. आता ते सिनेटमध्ये पास होण्याच्या मार्गावर आहे. सिनेटच्या मंजुरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होणार आहे. विशेष म्हणजे याला सत्ताधारी मजूर पक्ष आणि विरोधी लिबरल पक्षाचा पाठिंबा मिळाला आहे. त्यामुळे सिनेटमध्ये ते कोणत्याही अडथळ्याविना मंजूर होईल, असे मानले जात आहे. या विधेयकानुसार, पालकांची संमती किंवा आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या सोशल मीडिया खात्यांसाठी कोणतीही सूट दिली जाण-ार नाही. यातील मोठी बाब म्हणजे या प्लॅटफॉर्मपासून मुलांना दूर ठेवण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मलाच व्यवस्था करावी लागणार आहे. कायदा लागू झाल्यानंतर, बंदी कशी लागू करायची हे ठरवण्यासाठी प्लॅटफॉर्मकडे एक वर्ष असेल. या कालावधीमध्ये ते तसे करू न शकल्यास मोठा दंड भरावा लागेल. तो साधारणपणे ३२.५ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच २७० कोटी रुपयांचा असेल. सरकारने युक्तिवाद करताना काही महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले असून त्यांच्यानुसार ऑस्ट्रेलियन तरुणांसाठी सोशल मीडिया हानिकारक ठरू शकतो. आजमितीला १४ ते १७ वयोगटातील सुमारे ६६ टक्के ऑस्ट्रेलियन मुलांनी अतिशय हानिकारक ऑनलाइन सामग्री पाहिली असून यामध्ये औषधांचा चुकीचा वापर, आत्महत्या किंवा स्वत:ला हानी पोह-ोचवून घेणाऱ्या घातक मजकुराचा सम‍ावेश आहे. हे लक्षात घेऊन ऑस्ट्रेलियन सरकारने या वर्षी सोशल मीडियाचा वापर करण्यास योग्य अशी वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी तंत्रज्ञानाची चाचणी सुरू केली. आपल्या मुलांवर होणाऱ्या सोशल मीडियाच्या परिणामाची काळजी असणाऱ्या पालकांसाठी हे करणे गरजेचे असल्याचे सरकारने आपल्या निर्णयाचे समर्थन करताना म्हटले आहे. यावेळी ऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी आपण अनेक पालकांशी बोललो असल्याचे स्पष्ट केले.

या चर्चेतून अनेक पालक मुलांच्या ऑनलाइन सुरक्षिततेबद्दल चिंतित असल्याचे दिसून आल्याचे मत त्यांनी म‍ाध्यमांपुढे मांडले. अर्थातच टेक कंपन्यांनी या विधेयकाला विरोध केला आहे. खरे पाहता विधेयक मंजूर होण्यापूर्वीच त्याला तीव्र विरोध सुरू झाला होता. शंभरहून अधिक ऑस्ट्रेलियन आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी एक खुले पत्र लिहून आपली नाराजी आणि नापसंती सरकारपुढे मांडली होती. या पत्राद्व-ारे सरकारने ठरवलेली वयोमर्यादा खूप कठोर असल्याचे नमूद केले होते. या महत्त्वपूर्ण विधेयकासंदर्भात टेक कंपन्यांचे म्हणणे आहे की, वयोमर्यादा निश्चित करण्याबाबतच्या संशोधनाचे निकाल समोर येईपर्यंत सरकारने हे विधेयक मंजूर करू नये. त्यांचा असा युक्तिवाद आहे की, निकाल समोर आला नसताना उद्य-ोग किंवा ऑस्ट्रेलियन लोक या विधेयकासाठी आवश्यक असलेले वय किंवा अशा उपाययोजनांचा परिणाम समजू शकणार नाहीत.

तरुणांच्या मानसिक आरोग्यासाठी काम करणाऱ्या 'रीचआउट' या संस्थेनेही या कायद्यावर आक्षेप घेतला आहे. संस्थेच्या म्हणण्याप्रमाणे ७३ टक्के तरुण मानसिक आरोग्याचे जतन करण्यासाठी सोशल मीडियाची मदत घेतात. असे असताना घालण्यात येणाऱ्या बंदीमुळे या सुविधेमध्ये बाधा येऊ शकते. एवढेच नाही, तर अम्नेस्टी इंटरनॅशनल आणि ऑस्ट्रेलियाच्या मानवाधिकार आयुक्त लॉरेन फिनले यांनीही या विधेयकावर टीका केली आहे. एकीकडे असे असताना जगा-तील इतर देश या संदर्भात काय करत आहेत, याची माहितीही घ्यायला हवी. अमेरिकेने २६ वर्षांपूर्वीच मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेसाठी कायदा केला आहे. या कायद्याचे नाव 'चिल्ड्रन ऑनलाइन प्रायव्हसी प्रोटेक्शन क्ट' असे असून याअंतर्गत १३ वर्षांखालील मुलांची माहिती गोळा करण्यापूर्वी वेबसाइट्सना पालकांची परवानगी घ्यावी लागेल, असा नियम आहे.

२००० मध्ये चिल्ड्रन्स इंटरनेट प्रोटेक्शन क्ट अंतर्गत अनावश्यक सामग्रीपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी शाळा आणि ग्रंथालयांना इंटरनेट फिल्टर स्थापित करणे अनिवार्य करण्यात आले. तथापि, मुलांच्या वयाबाबत फसवणुकीची शक्यता तसेच या प्रकारच्या कृत्याला प्रोत्साहन देणारा ठरवून या कायद्यांवर टीका केली जाते. ऑस्ट्रेलियाच्या पावलावर पाऊल ठेवत ब्रिटिश सरकारही १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा विचार करत आहे. ब्रिटनचे टेक्नॉलॉजी सेक्रेटरी पीटर काइल यांनी सांगितल्याप्रमाणे ऑनलाइन सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, विशेषत: म‍ुलांसाठी जे काही लागेल ते ते केले जाण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच या देशातही अशा प्रकारचा कायदा लागू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. फ्रान्सने १५ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी शाळांमध्ये म‍ोबाइल फोनवर बंदी घालण्याची चाचणी सुरू केली आहे. ही चाचणी यशस्वी झाल्यास संपूर्ण देशात लागू केली जाऊ शकते. इतकेच नाही, तर फ्रान्समध्ये १५ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले पालकांच्या परवानगीशिवाय सोशल मीडिया वापरू शकत नाहीत, असाही कायदा आहे. त्याच वेळी नॉर्वेसारख्या युरोपीय देशानेही सोशल मीडिया वापरण्याची वयोमर्यादा १३ वरून १५ वर्षे करण्याची घोषणा नुकतीच केली आहे. हे सगळे बघता भारतासारखा सोशल मीडियाचा प्रचंड वापर करणारा देश नेमकी कोणती भूमिका घेतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. भारत हा जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश आहेच, खेरीज तरुणांची सर्वाधिक संख्या असणा-राही देश आहे. आपल्याकडेही अगदी लहान वयापासून मुलांच्या हातात फोन दिला जातो आणि ते सोशल मीडियावर सक्रिय होतात. महत्त्वाचे म्हणजे जगभरातील सर्वात स्वस्त इंटरनेट सेवा मिळत असल्यामुळे प्रत्येक वर्गातील मुले याचा बिनधोक वापर करताना दिसतात. स्वाभाविकच नकळत्या, कोवळ्या आणि अजाण वयात सोशल मीडियाच्या जंजाळात अडकून, चुकीची माहिती मिळवून गैरवापर करणाऱ्यांची मोठी संख्या आणि यायोगे घडलेले भीषण गुन्हे दररोज चर्चेत असतात. मुलांना ज्ञानाची गरज असते, यात शंका नाही. मात्र सोशल मीडियावरुन ही गरज भागवणारे ज्ञान मिळते की मुले चुकीच्या आणि अनावश्यक माहितीच्या महापुरात वहावली जातात, हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे भारत सरकारही या प्रश्नाचा साकल्याने अभ्यास करून आवश्यक ती पावले उचलेल, अशी आशा वाटते.

**– उर्मिला राजोपाध्ये**

## कॅन्सर उपचारातील प्रगत जनुक सुधारित सेल थेरपी जीएसटीच्या कक्षेबाहेर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रक्ताच्या कर्करोगाच्या उपचारासाठी आयआयटी मुंबई आणि टाटा कॅन्सर रुग्णालयाने विकसित केलेली प्रगत जनुक सुधारित सेल थेरपी वस्तू व सेवा कराच्या कक्षेतून वगळण्याचा निर्णय आज झालेल्या वस्तू व सेवा कर परिषदेत घेण्यात आला असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

वस्तू व सेवा कर परिषदेची ५५ वी बैठक दि. २१ - २२ डिसेंबर २०२४ रोजी जैसलम‍ेर, राजस्थान येथे आयोजित करण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली सुरु असलेल्या या परिषदेत देशभरातील सर्व राज्यांचे अर्थमंत्री, मंत्री सहभागी झाले आहेत. या परिषदेत महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधीत्व मंत्री कु. तटकरे करत आहेत.

याविषयी बोलताना मंत्री कु. तटकरे म्हणाल्या, कर्करोगावर उपचार घेणाऱ्या रुग्णांना शारीरिक, मानसिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यातच उपचारातील औषधांचा तसेच विविध पद्धतींचा आर्थिक भार मोठा असतो. आयआयटी मुंबई आणि टाटा कॅन्सर रुग्णालयाने संयुक्तरित्या विकसित केलेली प्रगत जनुक सुधारित सेल थेरपी जीएसटीमधून वगळण्याचा निर्णय आज घेण्यात आला आहे. रक्ताचा कॅन्सर बळावलेला असलेल्या टप्प्यांत रुग्णांच्या वैद्यकीय उपचारासाठी ही थेरपी वापरण्यात येते. आजच्या या निर्णयामुळे या थेरपीद्वारे उपचार घेणाऱ्या रुग्णांना दिलासा मि‍ळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनातून महाराष्ट्र राज्याच्या वतीने विविध विषयांवरील सुधारणा, बदलांबाबत या परिषदेत मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. आरोग्य सुविधा आणि सुलभ उपचाराच्या दृष्टीने कर्करोगाच्या उपचारासाठी असलेली थेरपी कराच्या कक्षातून वगळण्याची विनंती करण्यात आली होती, त्यास परिषदेने मान्यता दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

## गावगाथा दिवाळी अंकाला 'स्पंदन सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक' पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील वागदरी येथून प्रकाशित होणारेगावगाथा दिव-ाळी अंकाचे तिसरे वर्ष असून ग्रामीण संस्कृती, रूढी, परंपरा व ग्रामीण साहित्य, यासोबत ग्रामीण भागातील लेखकांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने मागील तीन वर्षांपासून दिवाळी अंक प्रकाशन केले जात आहे. वैशिष्ट्यपूर्ण मुखपृष्ठ, दर्जेदार साहित्यामुळे अल्पावधीतच गावगाथा दिवाळी अंक वाचकांच्या पसंतीस उतरला आहे. पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगांव) येथील स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित केलेल्या दिवाळी अंक स्पर्धेत गावगाथा दिवाळी अंकाला 'सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.यावेळी संपादक धोंडप्पा नंदे, प्रा.शिवशरण धड्डे सहाय्यक प्राध्यापक कृष्णा विद्यापीठ कराड यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन, प्रमुख पाहुणे श्री गुरु ष.ब्र.प्र.१०८ राष्ट्रसंत पद्मभास्कर डॉ.नीलकंठ शिवाचार्य महास्वामी धारेश्वर म‍हाराज (मठाधिपती तीर्थक्षेत्र आदिमठ संस्थान धारेश्वर ता.पाटण, जि.सातारा महाराष्ट्र) मुख्यमंत्री सहायता निधीचे माजी कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांना गौरविण्यात आले.

तसेच सुप्रसिध्द पार्श्व गायिका कविता राम, सुप्रसिध्द मालिका दिग्दर्शक विठ्ठल डाकवे, सुप्रसिध्द अभिनेते पंकज काळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार महिला आघाडीच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्या सौ. संगिता साळुंखे, पत्रकार गजानन तुपे, अभिनेत्री, रील स्टार अंजली आकळे, शिवम असोसिटसचे गुलाब जाधव, डॉ.संदीप डाकवे व अन्य मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमात प्राईड ऑफ स्पंदन अवॉर्ड, राज्यस्तरीय स्व.राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार, उत्कृष्ट दिवाळी



अंक स्पर्धा सेल्फी विथ गुढी स्पर्धेतील विजेत्यांचाही सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. संदीप डाकवे यांनी, सूत्रसंचालन शितल दवणे आणि आभार प्रदर्शन भीमराव धुळप यांनी केले.

# विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याकरीता येणाऱ्या अनुयायींना उत्तम सोयीसुविधा उपलब्ध करुन द्याव्यात : उपमुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पेरणे फाटा येथे १ जानेव-ारी २०२५ रोजी आयोजित विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याकरीता येणाऱ्या अनुयायींची गैरसोय टाळण्याच्यादृष्टीने आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, सोहळा शांततेत आणि उत्साहात साजरा व्हावा याकरीता सर्व संबंधित विभागांनी उत्तम नियोजन करावे, याकरीता शासनाच्यावतीने निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

हवेली तालुक्यातील मोजै पे-रणे फाटा येथे १ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या पूर्वतयारीबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार ज्ञानेश्वर कटके, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पिंपरी चिंचवडचे पोलीस सह आयुक्त शशिकांत महावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था तथा बार्टीचे म‍हासंचालक सुनील वारे, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता बप्पा बहीर आदी उपस्थित होते.



श्री. पवार म्हणा-ले, येत्या १ जानेव-ारी रोजी विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी येणाऱ्या अनुयायांची संख्या लक्षात घेता त्यादृष्टीने सर्व बाबींचे सूक्ष्म नियोजन करावे. गतवर्षीच्यावेळी राहिलेल्या त्रुटींची पूर्तता होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. परिसरात वाहतूक कोंडी होणार नाही याकरीता वाहतूक व्यवस्था, वाहनतळाचा आराखडा तयार करावा, स्वच्छतेसाठी पथकांची नियुक्ती आणि स्वच्छतागृहांसाठी पुरे-शा प्रमाणात पाण्याची सुविधा करावी. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची संख्याही विचारात घ्यावी.

पोलीस विभागाने वाहतुकीचे नियोजन करुन कायदा व सुव्यवस्थेबाबत नियोजन करावे. पीएमपीएमएलने पुरेशा बसेसची व्यवस्था करावी. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाने रस्त्यांची डागडुजी करून घ्यावी. अनुयायांची संख्या लक्षात घेऊन सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिकांही सुलभरित्या विजयस्तंभास अभिवादन करता येईल, याबाबत दक्षता घ्यावी. रुग्णवाहिका, प्रथमोपचार पेटी पुरेशा प्रमाणात ठेवाव्यात. एकंदरीत अभिवादन सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागाने समन्वयाने कामे करावीत, अशाही सूचना श्री. पवार म्हणाले.

बैठकीपूर्वी श्री. पवार यांनी विजयस्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले.

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून पेरणे फाटा येथील विजयस्तंभास अभिवादन; कार्यक्रमाच्या नियोजनाचा आढावा**

श्री. पाटील म्हणाले, विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याकरीता येणाऱ्या अनुयायांची संख्या विच-ारात घेऊन जिल्हा प्रशासनाच्यावतीने सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे. विभागीय आयुक्त, पोलीस आयुक्त यांनी स्वतः विजयस्तंभ परिसराला भेट देवून आढावा घेतला आहे. त्यांच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. विविध संघटनेच्या प्रतिनिधी सोबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन त्यांच्या सूचनाही विच-ारात घेतल्या जात आहेत, अभिवादन सोहळा यशस्वी करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे, असेही श्री. पाटील म्हणाले.

यावेळी विजयस्तंभ परिसराचे सुशोभिकरण, प्रकाशव्यवस्था, स्टॉल, मंडप उभारणी, वाहनतळ, वाह-तूक आराखडा, आरोग्य सुविधा, भोजनव्यवस्था, पिण्याचे पाणी, रस्त्यांची दुरुस्ती, तात्पुरते शौचालय उभारणी, स्वच्छतेसाठी घंटागाड्या, स्वच्छता, आपत्तकालीन प्रसंगी अग्नीशमन वाहनांची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, हिरकणी कक्ष, आपत्ती व्यवस्थापन आदींबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस पुणे शहरच्या उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे, हवे-लीचे उपविभागीय अधिकारी यशवंत माने यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे महानगरपालिका, पीएम आरडीए अग्नीशमन विभाग, जिल्हा परिषद, पोलीस विभाग, पीएमपीएमएल, आरोग्य विभाग, राज्य उत्पादन शुल्क आदी विभागांचे अधिकारी तसेच भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्यदिन समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे, माजी उप महापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १४ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास जुना उनाना का येतील पुण्याकडून सोलापूर कडे येणाऱ्या सर्विस रोड जवळील मडके वस्ती येथे घडली.याप्रकरणी विजय संगप्पा बनसोडे (वय-३७,रा. वारद नगर,मडके वस्ती) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहनचालकविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी यांचे वडील संगप्पा बनसोडे (वय-६०) हे पायी चालत जात असताना एसटी स्टँड ते राहत्या घराकडे परत येत असताना जुना पुना नाका येथील पुण्याकडून सोलापूर कडे येणाऱ्या सर्विस रोड वरील मडके वस्तीच्या बाजूला आले असता त्यांना कुठल्यातरी अज्ञात वाहनचालकाने निष्काळजीपणाने वाहन चालवून धडक दिली. व त्यानंतर वाहन न थांबवता अपघाताची माहिती न देता पळून गेला आहे. तसेच फिर्यादी यांच्या वडिलांना जखमी करून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे. असे फिर्यादित नमूद आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

# पंढरपूर शहर पोलीस ठाण्याकडे जप्त असलेल्या मोटरसायकली मूळ मालकाच्या दिले ताब्यात

## ७० मोटरसायकली असा एकूण पंधरा लाख रुपयांचा मुद्देमाल मूळ मालकाच्या ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर पोलीस ठाण्याकडील गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण शाखेचे मदतीने सोलापूर जिल्ह्यातील. पंढरपूर शहर पोलीस ठाण्यातील व इतर जिल्ह्यातील चोरीस गेलेल्या मोटरसायकलीचे ७० मोटरसायकली या गुन्हे शाखेकडून जप्त करून त्यांचे मूळ मालकांना शोध घेऊन मूळ मालकाच्या ताब्यात सदरच्या मोटरसायकली दिलेले आहेत सदर एकूण १५ लाख रुपये चा मुद्देमाल मूळ मालकाच्या ताब्यात देण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी ही मा. अतुल चंद्र कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण प्रीतम कुमार यावलकर अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण मा. डॉक्टर अर्जुन भोसले उपविभागीय पोलीस अधिकारी सो पंढरपूर विभाग पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, पंढरपूर शहर. आशिष साबळे सहाय्यक पोलीस निरीक्षक सहाय्यक पोलीस राजेश गोसावी सहाय्य पोलिस शरद कदम पोलीस टर्मुद्दीन मुजावर पोलीस प्रसाद आवटी, पोलीस सुरज हेंबाडे पोलीस सचिन हेंबाडे पोह दादासाहेब माने, पोह विठ्ठल विभूते, शहाजी मंडेले, हो कॉन्स्टेबल समाधान माने, पोको. बजरंग बिचुकले, पो.को. निलेश साबळे.पो.को. गोरख लोखंडे यांनी केलेली आहे.




# वैद्यकीय क्षेत्रासाठी इंडॉस्कॉपी एक वरदान : डॉ. उदयसिंह पाटील





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मानवी जीवनातील सध्या पोटाचे विकार झपाट्याने वाढत आहे यामध्ये पोटात दुखणे अपचन, मळमळ, पोटाचा कॅन्सर, वाढण्याचे प्रमाण अधिक आहे. व त्यांच्या तपासणीसाठी इंडॉस्कॉपी एक वरदान ठरत आहे अत्यंत आधुनिक लेटेस्ट मशीन संजीवनी हॉस्पिटल सांगोला येथे डॉक्टर सुधीर व डॉक्टर सुहास ढवळे यांनी आणल्यामुळे आता मिरज सांगली सोलापूर येथे जाण्याची गरज नाही तर सांगोला तेच पोटाचे निदान होणार आहे. व सांगोलाकर खरा-खरच तुम्ही नशीबवान आहात अशी संजीवनी हॉस्पिटल सांगोला यांच्या दुसऱ्या वर्धापनदिनी डॉक्टर उदयसिंह पाटील यांनी मत व्यक्त केले.

संजीवनी हॉस्पिटल सांगोला दुसऱ्या वर्धापनदिनी एंडोस्कोपी मशीनचे उद्घाटन मिरज येथील सुप्रसिद्ध डॉक्टर उदयसिंह पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी डॉक्टर सुधीर ढोबळे हे एक आज्ञाधारक डॉक्टर असून वैद्यकीय क्षेत्रात त्यांची काम अग्रेसर आहे एखादी शंका असल्यास फोनवरून विचारून त्यांचे निरसन करतात हे गुण त्यांचे वडील डॉक्टर शिवाजीराव ढोबळे यांच्याकडून त्यांच्याकडे आले असावे असे वाटते पोटाच्या उज्वल भविष्यासाठी एंडोस्कोपी द्वारे निदान होत तरी तरुणांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा अशी आव्हानही उदयसिंह पाटील यांनी यावेळी केले सुरुवातीच्या डॉक्टर उदयसिंह पाटील यांचे स्वागत डॉक्टर शिवाजीराव ढोबळे, डॉक्टर सुधीर डॉक्टर सुहास , डॉक्टर मोनिका, डॉक्टर रेश्मा व सौ प्रतिमा ढोबळे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी राजकीय सामाजिक शैक्षणिक, व इतर क्षेत्रातील सर्व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अज्ञात चोरट्याने खिशातून पळवला मोबाईल

सोलापूर, (प्रतिनिधी) : अज्ञात चोरट्याने फिर्यादी दिगंबर प्रकाश इप्पलपल्ली (वय-३६-,रा.कोंडा नगर,अक्कलकोट रोड) हे पुंजाळ मैदान शांती चौक येथे झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील बारा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. ही घटना ४ नोव्हेंबर रोजी घडली.याप्रकरणी दिगंबर इप्पलपल्ली यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो. ह. चव्हाण हे करीत आहेत.

# विठ्ठल रुक्मिणीमातेच्या पूजेची २६ डिसेंबरपासून ऑनलाईन नोंदणी : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

## दि. ०१ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ मधील पुजांची होणार नोंदणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा, तुळशी पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. दि. ०१ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील पुजांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि.२६ डिसेंबर रोजी स.११.०० पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.याबाबत मंदिर समितीच्या दि. २० ऑगस्ट रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. यापूर्वी पहिल्या टप्प्यात दि. ७ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून व देशभरातून कर्नाटक, आसाम, आंध्र प्रदेश इत्यादी राज्यातील भाविकांनी पूजेची नोंदणी केली होती. यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता, दुसऱ्या टप्प्यात दि. ०१ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या कालावधीतील सण, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून इतर दिवशीच्या श्रींच्या नित्यपूजा, तुळशीपूजा व पाद्यपूजा ऑनलाइन नोंदणीसाठी भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल.

याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६ -२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा असे आवाहन व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी केले आहे.

**घरबसल्या करता येणार पुजेची नोंदणी**

**श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेच्या नित्यपूजेसाठी अनुक्रमे रु.२५,०००/-, रू.११,०००/- तसेच पाद्यपूजेसाठी रू.५,०००/- व तुळशी पूजेसाठी रू.२१००/- इतके देणगी मुल्य आहे.**



### मंदिर समितीच्या सुरक्षा रक्षकाचा प्रामाणिकपणा महिला भाविकाचे दागिने शोधून केले परत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सुजित शेळवणे, मंडळाधिकारी टेंभुर्णी (ता.माढा) हे आपल्या कुटुंबासह रविवार दि.२२ डिसेंबर रोजी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन झाल्यानंतर संबंधित महिला भाविकाच्या गळ्यातील मंगळसूत्र गहाळ झाल्याचे लक्षात आले. त्यांनी मंदिर समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता दर्शनरांगेतील रक्षक ग्रुपचे सुरक्षा रक्षक आदित्य बाबर, यास सदर दागिने आढळून आले. त्यांनी तात्काळ नियंत्रण कक्षात दागिने जमा केले त्यानंतर खात्री करून संबंधित भाविकास ते परत करण्यात आले.

संबंधित दापत्यांना छत्रपती शिवाजी चौक येथे गेल्यानंतर सदरबाब त्यांच्या निर्दशनास आल्यानंतर त्यांनी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना संपर्क केला.व्यवस्थापक श्री श्रोत्री यांनी तात्काळ मंदिर समितीच्या नियंत्रण कक्षात संपर्क करून सुचना दिल्या. तद्नंतर सीसीटीव्ही ऑपरेटर यांनी कॅमेरातील रेकॉर्डींग पाहणी करून व सर्व सुरक्षा रक्षकांना वॉकीटॉकीद्वारे सुचना केल्या असता, दर्शनरांगेतील सुरक्षा रक्षक आदित्य तुकाराम बाबर, रक्षक ग्रुप यास सदरचे दागिने आढळून आल्यानंतर त्यांनी नियंत्रण कक्षात जमा केले व खात्री करून संबंधित भाविकास परत करण्यात आले.

सदरचे दागिने मिळाल्यानंतर प्रामाणिकपणे मंदिर समितीच्या कार्यालयात जमा केल्याबद्दल सुरक्षा रक्षकाचा मंदिर समिती मार्फत सन्मान केला व मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी देखील दुरध्वनीद्वारे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

सुजित शेळवणे यांचे कुटुंब श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त आहेत. सद्यस्थितीत, नाताळ / ख्रिसमस उत्सव सुरू असल्याने भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. श्रीमती शेळवणे यांना मंगलसुत्र परत मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद स्पष्टपणे दिसत होता. अवघ्या काही तासांनी आपल हरवलेल सौभाग्याचं लेणं मिळाल्याने त्यांनी मंदिर समितीच्या कर्मचाऱ्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# बब्बर खालसाशी संबंधित संशयीताला मुंबईतून अटक, एनआयएची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पंजाबमध्ये कट रचून दहशतवादी कारवाया केल्याप्रकरणी राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) जितंदर सिंह ऊर्फ ज्योति याला सोमवारी अटक केली. आरोपी मूळचा पंजाबमधील गुरूदासपूर येथील रहिवासी असून खलिस्तान दहशतवादी लखबीर सिंह ऊर्फ लांडा आणि गँगस्टर बचितर सिंह ऊर्फ पवित्र बाटला यांच्या विश्वासू साथीदार आहे. आरोपी बब्बर खालसासाठी शस्त्रास्त्रे वितरणाचे काम करीत होता.

एनआयएच्या तपासानुसार, जतिंदर हा बंदी घातलेल्या बब्बर खालसा (आंतरराष्ट्रीय) या दहशतवादी संघटनेशी संबंधित आहे. परदेशात असलेल्या लांडाने संघटनेची स्थापना केली होती. अटक आरोपी जतिंदर हा पवित्र बाटला याचा विश्वासू मानला जातो. तो लांडा व बाटला यांच्यासाठी पंजाबमध्ये शस्त्रांचे वितरण करण्याचे काम करीत होता, असा आरोप आहे. याप्रकरणी जुलै, २०२४ मध्ये बलजीत सिंह ऊर्फ राणा भाईला अटक झाली होती. तेव्हा आरोपी जतिंदरचा याप्रकरणातील सहभाग उघड झाला होता.




जतिंदर सिंहने मध्य प्रदेशातून शस्त्र पुरवठादार बलजित सिंह ऊर्फ राणाभाईकडून दहा पिस्तुले आणली होती. ती पंजाबमधील लांडा व बटाला यांच्याशी संबंधित व्यक्तींना पुरवली होती. तो गेल्या अनेक महिन्यांपासून मध्य प्रदेशातून तस्करी करून पंजाबमध्ये शस्त्रे आणण्याच्या प्रयत्नात होता. त्याची माहिती एनआयएला मिळाल्यानंतर त्याचा डाव उधळला.

पंजाबमधील दहशतवाद कट प्रकरणात जतिंदरची अटक महत्त्वाची मानली जाते. याशिवाय दहशतवादी कटासाठी शस्त्र व स्फोटके पुरवणारी मोठी साखळी मोडीत काढण्यात एनआयएला यश आले.

**विद्यार्थ्यांना स्वेरी कॅम्पस मधून घेता येणार अंतराळाची माहिती** **उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार यांची माहिती**

# स्वेरीत मंगळवार व बुधवार रोजी अवकाश महायात्रेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'लक्षावधी किलोमीटर दूर असूनही इथूनच दिसणारे सूर्य, चंद्र, तारे आणि एकूणच अंतराळाचे विद्यार्थ्यांना कायम कुतूहल असते. त्यांची वैज्ञानिक माहिती घेऊन, अंतराळ सफरीचा अनुभव घेण्यासाठी भारतीय अंतराळ संस्थेने (इस्त्रो) मोहीम हाती घेतली आहे. केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या इस्त्रोने अंतराळातील माहितीचे ज्ञान विद्यार्थ्यांना यावे यासाठी एक विशेष बस तयार केली असून, विद्यार्थ्यांना बसच्या माध्यमातून चंद्र, सूर्य, ग्रह, तारे जवळून पाहण्याची अनुभूती घेत अंतराळाची वैज्ञानिक माहिती घेता येणार आहे. ही सुविधा मंगळवार, दि. २४ व बुधवार दि. २५ डिसेंबर, २०२४ या दोन दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत स्वेरी कॅम्पस मध्ये उपलब्ध केली आहे.' अशी माहिती उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार यांनी दिली.




इस्त्रो, विज्ञान भारती, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे डॉ. बी. पी. रोंगे व स्वेरी चिन्ह.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्य डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, दि. २४ व बुधवार दि. २५ डिसेंबर २०२४ या दोन दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत 'विज्ञान भारती' आणि 'इस्त्रो 'यांच्या संयुक्त विद्यमाने या अंतरीक्ष महायात्रेचे आयोजन केले आहे.

विज्ञान भारतीच्या आखिल भारतीय सदस्य डॉ.मानसी माळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली या बसचे स्वेरी कॅम्पसमध्ये आगमन होणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत या बसच्या माध्यमातून अंतराळातील घडामोडींची माहिती व खगोल विज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यातून विज्ञानाची गोडी आणखी वाढणार आहे. 'या अवकाश महायात्रेमुळे लक्षावधी किलोमीटर दूर असलेले सूर्य, चंद्र, तारे याची माहिती स्वेरी कॅम्पसमधून मिळणार आहे. याचा फायदा सर्व विद्यार्थ्यांना होणार आहे. तरी हा उपक्रम विद्यार्थी, पालकांबरोबरच सर्वांसाठी खुला आहे. तरी परिसरातील सर्व विद्यार्थ्यांनी या माहिती व तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा.' असे आवाहन उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांनी केले आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### शिवगंगा नगर येथून टिप्पर पळवला

सोलापूर (प्रतिनिधी) पारशी विहीर लगत असलेल्या शिवगंगा नगर भाग १ येथे या फिर्यादी जफर अमिन शेख (वय-२९,रा.मुस्लिम पाच्छा पेठ) यांचा टाटा कंपनीचा टिप्पर क्रमांक एम एच.४२.बीएफ.०४४५ हा वरील ठिकाणी वरील ठिकाणाहून कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. ही घटना २२ डिसेंबर रोजी घडली.याप्रकरणी जफर शेख यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिव हे करीत आहेत.

### दुचाकीवर येऊन तरुणाचा मोबाईल पळवला

सोलापूर (प्रतिनिधी) कोणीतरी अज्ञात दोन इसमांनी दुचाकीवर पाठीमागून येऊन फिर्यादी मोहन विनायक पवार (वय-२०-,रा.वसुंधरा नगर,विनायक नगर जवळ) यांचा आठ हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसका मारून जबरदस्तीने ओढून चोरून नेला आहे.ही घटना २२ डिसेंबर रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास सुनील नगर वी आर एल ऑफिस जवळ घडली.याप्रकरणी मोहन पवार यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पाटील हे करीत आहेत.

# सर्व शासकीय विभागांनी आपले सरकार पोर्टल वरील तक्रारींचा वेळेत निपटारा करावा : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## सुशासन सप्ताह निमित्त जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत सुशासन सप्ताह साजरा केला जात आहे, याच अनुषंगाने सर्व शासकीय विभागांनी व त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांनी त्यांच्याकडे येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारी तसेच आपले पोर्टल सरकारवर येणाऱ्या विविध तक्रारींचा त्वरित निपटारा करावा. आणि सर्व शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यापर्यंत अत्यंत गतिमान पद्धतीने पोहोचवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

देशाचे माजी प्रधानमंत्री स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंती निमित्त २५ डिसेंबर हा सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. सामान्य प्रशासन विभागाच्या सूचनेप्रमाणे १९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत जिल्हास्तरावर सुशासन सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय सुशासन कार्यशाळेत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, एडवोकेट जगदीश धायतिडक, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व जिल्हास्तरीय अधिकारी तहसीलदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, शासनाने सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयात न येता त्यांच्या

> ■ जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत सुशासन सप्ताह राबविला जात आहे
> ■ ॲड. जगदीश धायतिडक यांचे दिवाणी व महसुली कायद्याच्या अनुषंगाने विषयक सविस्तर मार्गदर्शन

तक्रारी त्यांना योग्य पद्धतीने करता येतील व त्याचा वेळेत निपटारा होऊन त्यांना समाधान मिळेल व गतिमान पद्धतीने शासनाचे काम होईल याकरता आपले सरकार पोर्टल सुरू करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी यांनी आपले सरकार पोर्टलवर आलेल्या सर्व प्रकारच्या तक्रारींची अत्यंत गांभीर्यपूर्वक दखल घेऊन त्याचा वेळेपूर्वी निपटारा करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

त्याप्रमाणेच प्रत्येक तहसील कार्यालयामार्फत एक क्यूआर(QR) कोड तयार करावा. व हा कोड त्या तहसील कार्यालयातील प्रत्येक गावापर्यंत व नागरिकांपर्यंत पोहोचल याची काळजी घ्यावी. हा क्यू आर कोड स्कॅन करून त्या तहसील कार्यालय व तालुकास्तरीय यंत्रणाबाबत नागरिकांच्या ज्या काही तक्रारी असतील त्या तक्रारी नागरिकांमार्फत केल्या जातील व त्याचा निपटारा तालुकास्तरीय प्रशासकीय यंत्रणेने त्वरित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकापर्यंत शासकीय योजनेचा लाभ मिळत आहे की नाही याबाबत खात्री करण्यासाठी एका एजन्सी मार्फत दररोज किमान १ ते २ हजार नागरिकांना फोन कॉल करण्यात येतील व त्यांना मिळणाऱ्या योजनेविषयी माहिती घेतली जाणार आहे, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी सुशासनाचे महत्त्व सांगून प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयात आलेल्या तक्रारींच्या वेळेत



निपटारा होण्याबाबत दक्षता घेण्याची सूचना केली. तसेच आजच्या जिल्हास्तरीय सुशासन सत्ता कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक एडवोकेट धायतिडक यांनी महसूल प्रशासनातील दिवाणी व महसुली कायद्याचे महत्त्व सांगून त्या कायद्याच्या अनुषंगाने कशा पद्धतीने कोणत्या कलम ाखाली कार्यवाही करावयाची याची अत्यंत बारकाईने माहिती दिली.

यावेळी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये उत्कृष्ट काम केलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्रातिनिधिक स्वरूपात जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या हस्ते सन्मानपत्र वितरित करण्यात आले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी सुशासन सप्ताह निमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली तसेच आजच्या कार्यक्रमाचे महत्त्व सांगितले. तर या कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे आभार तहसीलदार श्रीकांत पाटील यांनी मानले.

# परभणी प्रकरणाचे पडसाद; मेरा खुर्द येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुयायांनी केला रास्ता रोको




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील मेरा खुर्द येथे आंबेडकरी अनुयायींकडून परभणीतीत झालेल्या संविधानाच्या प्रतीची विटंबना आणि कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूचे पडसाद राज्यभर उमटत आहे त्या अनुषंगाने मेरा खुर्द येथे २३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता आंबेडकरी अनुयायींकडून निदर्शने करत मुख्य राष्ट्रीय चिखली जालना महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला.अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत मेरा खुर्द, अंत्री खेडेकर,मनुबाई,गुंजाळा,भरोसा,असोला,शिंदी आदी गावातील आंबेडकरी अनुयायींकडून एकत्र येवून परभणीत झालेल्या घटनेचा निषेध व सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरनाला कारणीभूत असलेले केंद्रीय गृहमंत्री अमितशहा यांचा जाहीर निषेध करण्यासाठी सर्जेराव गवई,सुनिल गवई,रवींद्र गवई,उपसरपंच भास्कर मोरे , सेवानिवृत्त भास्कर मोरे,उत्तम मोरे,यांच्या मार्गदर्शनाखाली बंदची हाक देत कडकडीत बंद ठेवण्यात आला.यासाठी अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांनी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात ठेवला होता.त्यामध्ये हॉटेल,दुकाने,आदी व्यापाऱ्यांकडून कडकडीत बंद पाळण्यात आला.मेरा खुर्द बंदची सुरुवात आंबेडकरी अनुयायींनी भव्य मोर्चा काढत अमित शहा यांच्या बॅनरची चप्पल बूटाची माळ घालून निदर्शने दिले ही भव्य मिरवणूक बुद्ध विहारापासून तर मेरा चौकी हायवे रोडपर्यंत काढण्यात आली. मिरवणुकी दरम्यानआंबेडकरी अनुयायींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हार अर्पण करुण मेरा खुर्द येथील मुख्य चौफुलीवर निर्दशने देत रास्ता रोको केला. रास्ता रोको झाल्यामुळे अनेक वाहणाची तारांबळ झाली. मात्र त्वरित ठाणेदार यांच्या पुढाकाराणे आंबेडकरी अनुयायींनी भाषणबाजी करुण त्रीशरण पंचशील घेवून रास्ता रोकोची सांगता करण्यात आली. यावेळी मेरा खुर्द, अंत्री खेडेकर, मनुबाई, गुंजाळा, भरोसा,असोला,शिंदी अशा आदी गावातील सर्जेराव गवई,सुनिल गवई,गौतम गवई, रवींद्र गवई, मधुकर गवई, श्रीकृष्ण गवई प्रकाश गवई, आनंद गवई, उत्तम मोरे, समाधान मोरे,भिमा मोरे, बबन मोरे, जय मोरे, संतोष गायकवाड आदी शेकडो आंबेडकरी अनुयायीं मोठया संख्येने उपस्थिती होते. या रास्ता रोको शांततेत पार पडण्यासाठी ठाणेदार विकास पाटील, दुय्यम ठाणेदार जारवाल, पीएसआय वाघ, बिट जमदार उगले, पोहेकॉ गवई, गणेश देढे, सोनकांबळे, जाधव, गिरी, पोफळे, राठोड, खार्डे, आदिनी मोलाचे सहकार्य केले.

# भूमिपुत्राचा ‘एल्गार ’... ‘निंबार’

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर प्रतिनिधि /दिनेश घनघाव : दिनांक १८डिसेंबर २०२४ रोजी ६२ व्या हौशी राज्य नाट्य स्पर्धेत ज्ञानमैत्री संस्थेचे सुबोध चित्र या नाट्य संस्थेने सादर केलेल्या 'निंबार ' नाटकाला प्रेक्षकांचा प्रचंड गर्दीत प्रयोग पार पडला . निंबार म्हणजे कडक ऊन. आपल्या पूर्वजांनी निंबार खाल्ले म्हणून जमिनी टिकून आहेत. ती जमीन विकू नये हा संदेश या नाटकात दिला आहे. सदर नाटकात आगरी बोली भाषा वापरली आहे. तिचा ठसका आणि गोडवा प्रेम जाधव यांच्या भूमिकेतून दिसतो. नाटकाचे लेखन, दिग्दर्शन, भूमिका डॉ.. प्रेम परशुराम जाधव यांनी लिलया पेलल्या आहे.

विशेष म्हणजे दोन भिन्न भूमिका म्हणजे रघु व संत्या त्यांनी साकारली आहेत. 'प्रियांका घरतने संत्याची पत्नी शारदा तर वासुदेव म्हात्रे याने साजन पात्र. बाळकृष्ण कोठेकरने भाऊ,एकनाथ चौधरी यांनी शहा शेठ ची भूमिका, 'झी'चा उत्तम डान्स, राजेश सकपाळ व आनंद जाधव यांची उत्तम जोडी,आकांक्षा कांबळेचे लक्ष्मी पात्र, सुबोध जाधवचे लहान संत्या पात्र भारी, तर एक विशेष म्हणजे चिमुकल्या प्रबुद्ध जाधवने सर्वांची मने जिंकली. दीपक घाग 'शहा 'चा फंटर दिसला. आशिश हेलोडेचा इन्स्पेक्टर दिसला.जान्हवी फडतरेची गावची मुलगी भावली. यात नकारात्मक भूमिका करणारे अमोद वैद्य प्रेक्षकांच्या गळ्यातील ताईत बनले. तसेच मयुरेश मोडक यांची प्रकाश योजना उत्तम होती. संगीत आनंद जाधव आणि अबोली जाधव यांनी समर्पक दिले आहे. वेशभूषा व रंगभूषा सुवर्णा जाधव व अस्मिता सावंत यांची असून नेपथ्य वासुदेव म्हात्रे व प्रेम जाधव यांचे होते. रंगमंच व्यवस्था वैष्णवी पाटील, विजय देवरे, गणेश वाघमारे, शैलेश प्रधान,प्रथमेश भट, अनिकेत उत्तम केली. एकंदरीत प्रयोग छान झाला. उत्तम प्रयोग झाला म्हणून अध्यक्ष डॉ. विकास जाधव यांनी कलाकारांचे आभार मानले.







**महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून मोर्चास सुरूवात**


**पोलीस निरीक्षण गजेंद्र सरोदे यांना दिले निवेदन**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल गरळ ओकणाऱ्या अमित शहा व परभणी प्रकरणाच्या निषेधार्थ भिमसैनिकांचे नळदुर्ग बंद करून निदर्शने मोर्चा आंदोलन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल देशाचे गृहमंत्री अमीत शहा यांनी केलेल्या आक्षेपार्ह विधान बद्दल अमित शहा यांच्या निषेधार्थ आणि परभणी येथील भिमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या संबंधित पोलिस प्रशासनाच्या विरूद्ध नळदुर्ग ता.तुळजापूर येथे नळदुर्ग आणि परिसरातील भिमसैनिकांच्या वतीने कडकडीत नळदुर्ग बंद करून निदर्शने मोर्चा काढून जाहीर निषेध करून विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल आंबेडकर ,आंबेडकर असे म्हणण्याची फॅशन झाली आहे. असे म्हणून त्यांचा अवमान केला. अमित शहा यांच्या या आक्षेपार्ह विधानचा जाहीर निषेध व परभणी येथील शहीद भिमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू कारणीभूत असलेल्या पोलीस प्रशासनाच्या विरोधात नळदुर्ग येथे भिमसैनिकांच्या वतीने कडकडीत नळदुर्ग बंद करून निदर्शने मोर्चा काढण्यात आला होता. भिमनगर नळदुर्ग येथील बौद्ध विहार पासून मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून मोर्चास सुरूवात करण्यात आली.भिमनगर बौद्ध विहार ते कुरेशी गल्ली, किल्ला गेट, चावडी चौक मार्गे भव्य निदर्शने करित अमित शहा यांच्या निषेधार्थ प्रचंड घोषणाबाजी करीत हा मोर्चा येथील बसस्थानका समोर संविधान चौकात येऊन थांबला.या



ठिकाणी या मोर्चाचे जाहीर निषेध सभेत रूपांतर झाले. या प्रसंगी अमित शहा यांनी देशाची माफी मागून गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा, शाहिद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबाचे पन्नास लाख रुपये देऊन पुनर्वसन करावे, सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना कायमस्वरूपी निलंबित करून त्यांच्याशर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा आदी सह विविध मागण्यांचे निवेदन नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना देण्यात आले.



यावेळी सुनील बनसोडे, बाबासाहेब बनसोडे, दुर्वास बनसोडे, एस.के.गायकवाड, किशोर नळदुर्गकर, कैलास गवळी गुरुजी, अरूण लोखंडे, योगेश बनसोडे, सचिन बनसोडे, सिध्दांत बनसोडे, अजयकुमार बागडे, रूषीकेश कांबळे, अश्वजीत कांबळे, मारुती बनसोडे, शामकांत नागीले, दत्ता बनसोडे, महादेव कांबळे, राजेंद्र शिंदे, सरेश लोंढे, विश्वास रणे, तानाजी कदम, वामन धाडवे, रवी वाघमारे, अनिल वाघमारे, महिला कार्यकर्त्या उषा शिंदे, पिंकी भोसले, संगीता वाघमारे, कल्पना गायकवाड, स्नेहा झेंडार, सह नळदुर्ग व परिसरातील शेकडो भिमसैनिक उपस्थित होते.

